# महाराष्ट्र शासन

## सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग

१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे ४११ ००१

दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२२७८३ E-mail : jdhepune.gmail.com फॅक्स नंबर ०२०-२६०५१६३२


क्र. ससं/उशि/पुवि/परिपत्रक/२०१९ /3855 दि. १८/१२/२०१९

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व अशासकीय कला,वाणिज्य,विज्ञान,विधी व
शारिरीक शिक्षण व अध्यापक महाविदयालये, पुणे

२. कुलसचिव,सावित्रीबाई फुले पुणे विदयापीठ, पुणे

३. कुलसचिव,डेक्कन कॉलेज, पुणे

४. कुलसचिव,गोखले इस्टिट्यूट, पुणे

५. कुलसचिव,यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विदयापीठ, नाशिक

विषय - महाविदयालयीन विदयार्थ्यांसाठी सायबर गुन्हे जागरुकता अभियान राबविणेबाबत
संदर्भ - पोलीस उपआयुक्त आर्थिक व सायबर गुन्हे, पुणे शहर यांचे पत्र क्र.६१४ दि. १६/१२/२०१९

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधीन पोलीस उपआयुक्त आर्थिक व सायबर गुन्हे, पुणे शहर यांचे पत्र क्र.६१४ दि. १६/१२/२०१९ पत्र सोबत जोडले आहे.सदर पत्रान्वये असे कळविले आहे की, नागरीकांमध्ये सायबर गुन्हयांविषयक जागरुकतेची गरज असल्याने विविध स्तरावर नागरीकांसाठी जागरुकता अभियान सुरु करण्यात आलेले आहे.

या कार्यक्रमांतर्गत महाविदयालयात वैयक्तीक जावून सायबर गुन्हे जागरुकतेबाबत मार्गदर्शन करणे प्रस्तावित आहे. सदरचा कार्यक्रम संपूर्ण वर्षभर सुरु राहणार आहे. सदर कार्यक्रमासंदर्भात पुणे शहर सायबर पोलीस स्टेशन मार्फत मच्छिंद्र पंडित ,पोलीस निरीक्षक मो.नं.९५९४९९४२४२ व सागर पडवळ, पोलीस उपनिरीक्षक मो. नं. ९६८९५५२५०१ सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर यांची आयोजन व समन्वय अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे.

तरी सदर सायबर गुन्हे जागरुकते संदर्भात समुपदेशनाचा लाभ आपल्या महाविदयालयातील विदयार्थी/विदयार्थीनी, स्टाफ व कर्मचारी यांना मिळण्यासाठी सायबर पोलीस स्टेशन,पुणे शहर यांचेशी समन्वय साधून सायबर गुन्हयांबाबत जागरुकता निर्माण करण्यात यावी.

१८/१२

( डॉ. मोहन खताळ)
सहसंचालक,उच्च शिक्षण,
पुणे विभाग,पुणे

| | | |
|---|---|---|
| | **संभाजी कदम**<br>**पोलीस उपआयुक्त,**<br>**आर्थिक व सायबर गुन्हे,**<br>**पुणे शहर** | **जा.क्र./पोउआ/आवसा/ ६१४ /२०१९**<br>**२, साधु वासवानी रोड, पोलीस कमिशनर ऑफ पोलीस ऑफिस, कॅम्प पुणे ४११००१**<br>**दि. १६ / १२ / २०१९** |

प्रति,
सहसंचालक,
उच्च शिक्षण,
१७, आंबेडकर रोड, कॅंप, पुणे-०१.

विषय - महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी सायबर गुन्हे जागरुकता अभियान राबविणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की, सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे येणाऱ्या तक्रारी अर्जाचे प्रमाण पाहता असे लक्षात येते की, नागरिकांमध्ये ऑनलाईन व्यवहाराबाबतचे परिपुर्ण ज्ञान नसल्याने तसेच इंटरनेट बँकिंग, ऑनलाईन ॲप्लिकेशन्स, पेमेंट पोर्टल्स या प्रकारच्या सुविधांविषयी इत्यंभूत माहिती नसल्याने सायबर गुन्ह्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत आहे. नोकरी, विवाह, लोन, वस्तूंची खरेदी विक्री असे अनेक बहाणे करुन नागरिकांची मोठ्या प्रमाणात ऑनलाईन फसवणूक होत आहे. तसेच सोशल मिडीयावरुन बदनामी, ब्लॅकमेलींग व तत्सम गुन्ह्यांचे प्रमाण वाढत आहे. यासाठी नागरीकांमध्ये सायबर गुन्ह्यांविषयक जागरुकतेची गरज असल्याने सायबर पोलीस स्टेशन पुणे शहर यांचेमार्फत विविध स्तरावर नागरीकांसाठी जागरुकता अभियान सुरू करण्यात आलेले आहे. याचाच एक भाग म्हणून शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना सायबर गुन्ह्यांबाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे.

सर्व शैक्षणीक संस्थांमधील विद्यार्थी हे उज्ज्वल भारताचे भविष्य असल्याने त्यांना सायबर गुन्ह्यांसदर्भात जागरुकता निर्माण करुन दिल्यास ते याबाबत चांगला प्रतिसाद देवून एक जबाबदार नागरिक बनविण्यास सहाय्य करतात. तसेच आपल्या पालकांना व सहकारी मित्रांना सबंधीत माहिती पटवून सांगतात. यासाठी सायबर पोलीस स्टेशन मार्फत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन व्यवहार, इंटरनेट, सोशल मिडीया, ऑनलाईन बँकींग, पेमेंट पोर्टल्स यांचा वापर करताना घ्यावयाची काळजी यासंदर्भात समुपदेशन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर चे सायबर गुन्ह्यांबाबतचे तांत्रिक व कायद्याचे ज्ञान असलेले पोलीस अधिकारी, कर्मचारी यांचा कक्ष तयार करण्यात आलेला आहे.

या कार्यक्रमांतर्गत आपले महाविद्यालयात वैयक्तीक जावून सायबर गुन्हे जागरुकतेबाबत मार्गदर्शन करणे प्रस्तावित आहे. सदरचा कार्यक्रम संपूर्ण वर्षभर सुरु राहणार आहे. सदर कार्यक्रमासंदर्भात पुणे शहर सायबर पोलीस स्टेशन मार्फत मच्छिंद्र पंडित, पोलीस निरीक्षक (मो. नं. ९५९४९९४२४२) व सागर पडवळ, पोलीस उपनिरीक्षक (मो. नं. ९६८९५५२५०१), सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर यांची आयोजन व समन्वय अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे.

तरी सदर सायबर गुन्हे जागरुकतेसंदर्भात समुपदेशनाचा लाभ आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व अशासकीय कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी / विद्यार्थीनी, स्टाफ व कर्मचारी यांना मिळण्यासाठी नमुद कार्यालयांना आवाहन देवून सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर यांचेशी समन्वय साधून त्यांना सहकार्य करण्यासाठी सुचित करावे अशी विनंती आहे.

**(संभाजी कदम)**
**पोलीस उप-आयुक्त**
**आर्थिक व सायबर गुन्हे,**
**पुणे शहर.**